मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

विद्यार्थी उपक्रम पुस्तिका

इयत्ता : पहिली

नाव : .....

शाळेचे नाव : .....

इयत्ता : ..... तुकडी : .....

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

अनुक्रमणिका

ठिपके जोडून घराचे चित्र तयार करा आणि रंगवा	१
रोज आम्ही शाळेत जाणार	२
प्राणी–पक्षी	२
पावसामध्ये भिजू चला...	३
मी नियम पाळणार...	४
नियम शाळेचे	५
योग्य की अयोग्य?	६
माझी अंघोळ	८
असे घासतो दात...	९
असे धुतो हात	९
सांगा सांगा करता काय?	१०
शाळेमधल्या गमती	१२
योग्य आणि अयोग्य वर्तन	१३
तर काय होऊ शकेल?	१४
खेळू काळजीने...	१५
चित्रे पाहून गोष्ट सांगा	१६
तीन माकडे	१७
मुले काय करीत आहेत?	२१
पोस्टर तयार करूया	२२
नम्र का उद्धट?	२३
नंतर काय झाले असेल?	२४
चांगला मित्र कोण?	२४
जोडू नवे मित्र	२५
मैत्रीचे गाणे	२५
मुले काय करीत आहेत?	२६
त्यांना काय वाटत असेल?	२७
सागर दु:खी का आहे?	२८
भारतातली मुले	२९
वेगवेगळी कामे	३०
उंदराची टोपी	३१
वर्तमानपत्राच्या कागदापासून टोपी तयार करा	३३
माझे घोषवाक्य	३४
मी असे करतो	३५
रिकाम्या वेळेत करायचे उपक्रम	३६
शिक्षक नोंदी	३८

निर्मिती व प्रकाशन :

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

संस्थापक, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे

मुद्रक : रुना ग्राफिक्स, पुणे

© सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून २०१७

शिक्षकांसाठी टीप :

ही पुस्तिका प्राथमिक शाळेसाठी शिक्षक उपक्रम पुस्तिका इयत्ता पहिली या पुस्तिकेशी संबंधित आहे.

मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

विद्यार्थी उपक्रम पुस्तिका

इयत्ता : पहिली

नाव : ----------

शाळेचे नाव : ----------

इयत्ता : ---------- तुकडी : ----------

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

ठिपके जोडून घराचे चित्र तयार करा आणि रंगवा



रोज आम्ही शाळेत जाणार

शाळेला जातो आम्ही
शाळेला जातो,
खेळायला जातो आम्ही
शिकायला जातो!

रोज रोज आम्ही
शिकायला जातो
मित्रांच्या बरोबर
शाळेत रमतो!

नवी नवी कामे
करायला जातो
कामातून आम्ही
खूप काही शिकतो!

शाळेला जातो आम्ही
शाळेला जातो,
खेळायला जातो आम्ही
शिकायला जातो!

प्राणी-पक्षी

प्राणी, पक्षी मज आवडती,
धमाल त्यांची सांगू किती

चिमणीताई चिवचिव करते,
दाणे टिपुनी भुर्रकन उडते
हिरव्या पानामागे लपती
पोपट मैना गोड बोलती

मोर पिसारा छान फुलवुनी
नाचे थुईथुई ताल धरोनी
खारूताई चपळ किती ती,
सरसर चढते झाडावरती

हळूहळू तो हत्ती चालतो,
सुपाएवढे कान हलवितो
माकड झुलते फांदीवरती
हरिण धावे वाऱ्यावरती

पावसामध्ये भिजू चला...

आला आला पाऊस आला
अंगावरती त्याला झेला
पाऊस आला आपल्यासाठी
घेऊ त्याच्या गाठी–भेटी
चला अंगणी जाऊ या
पाण्यामध्ये नाचू या
पाण्यामध्ये जो भिजतो
शंभर गुण तो घेतो

मी नियम पाळणार...

मी नियम पाळणार,
मी सूचना ऐकणार
मी वेळेवर येणार,
मी नियम पाळणार

गणवेश मी घालणार,
वही, पुस्तक आणणार,
अभ्यास रोज करणार
मी नियम पाळणार

हात धुऊन जेवणार,
रांग नाही मोडणार,
डाव्या बाजूने चालणार,
मी नियम पाळणार

आई, बाबांचे ऐकणार,
मित्रांशी नाही भांडणार,
शहाण्यासारखे वागणार,
मी नियम पाळणार

नियम शाळेचे

नियम पाळूया,
आपण नियम पाळूया
शाळेचे आपण सारे
नियम पाळूया

घालूनी गणवेश,
शाळेत येऊया
वह्या, पुस्तके,
सोबत आणूया

दप्तरातल्या वस्तूंची,
काळजी घेऊया
एकमेकांच्या वस्तूंची,
काळजी घेऊया

मित्रांच्या सोबत,
मैत्री टिकवूया
शाळेतल्या शिक्षकांचा,
आदर करुया

वर्ग आपुला,
स्वच्छ ठेवूया
शाळेचे सारे,
नियम पाळूया

योग्य की अयोग्य?

ज्या चित्रात मुलांचे वागणे बरोबर आहे, त्या चित्रातील चौकोनात ✓ अशी खूण करा. ज्या चित्रात मुलांचे वागणे चुकीचे आहे, त्या चित्रातील चौकोनात ✗ अशी खूण करा.

माझी अंघोळ

हात, पाय, अंग धुतो
रोज मजेत अंघोळ करतो
अंगाला साबण लावतो
पांढरा पांढरा फेस होतो

हातावर पांढरा फेस
पायावर पांढरा फेस
अंगावर पांढरा फेस
सगळीकडे फेसच फेस

अंगावर पाणी घेतो
फेस सगळा पळून जातो
जाता जाता आमच्या
अंगाला गुदगुल्या करतो

किती वेळ चालली अंघोळ?
आई तिकडून ओरडते
अंग पुसून खसखसा
बाहेर यायची गडबड उडते

असे घासतो दात...

पेस्ट घेऊनी ब्रशवरती
ब्रश धरतो तोंडात
असे घासतो दात आम्ही, असे घासतो दात

उजवा, डावा, खाली, वरती
ब्रश फिरतो तोंडात
असे घासतो दात आम्ही, असे घासतो दात

खुळखुळ भरतो चुळा घेऊनी
पाणी आम्ही तोंडात
असे घासतो दात आम्ही, असे घासतो दात

असे धुतो हात

असे धुतो हात
आम्ही असे धुतो हात
मागून, पुढून, सगळीकडून
धुतो आम्ही हात

पाणी घेऊ हातावरती
साबण लावतो वरती, खालती
खसाखसा घासून स्वच्छ
धुतो आम्ही हात

जेवणाआधी हात धुतो
जेवणानंतर हात धुतो
बाहेरून आलो हात धुतो
खेळून आलो हात धुतो

सांगा सांगा करता काय?

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
घरकामाला आम्ही मदत करतो

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
घरातला केरकचरा काढतो

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
पांघरुणाच्या घड्या घालतो

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
भावंडांची काळजी घेतो

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
स्वत:च आवरून तयार होतो

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
आजी-आजोबांना मदत करतो

पहिला गट : सांगा सांगा करता काय?
सांगा घरी तुम्ही, करता काय?

दुसरा गट : ऐका आम्ही काय सांगतो
प्राण्यांची काळजी घेतो

शाळेमधल्या गमती

शाळेत चला, शाळेत चला
शाळेत चला रे
खूप खूप शिकूया, खूप खूप शिकूया
खूप खूप शिकूया रे.

नवेनवे मित्र, नवेनवे मित्र
नवेनवे मित्र जोडूया रे.
वाचन, लेखन, वाचन, लेखन
वाचन, लेखन करूया रे.

गाणी, कविता, गाणी, कविता
गाणी, कविता म्हणूया रे.
हसत खेळत, हसत खेळत
हसत खेळत खूप शिकूया रे.

शाळेत चला, शाळेत चला
शाळेत चला रे...
खूप खूप शिकूया, खूप खूप शिकूया
खूप खूप शिकूया रे.

योग्य आणि अयोग्य वर्तन

खालील चित्रे पाहा. ज्या चित्रातील वर्तन योग्य आहे त्या चित्रातील चौकोनात ✓ अशी खूण करा. चित्रातील वर्तन अयोग्य असल्यास त्या चित्रातील चौकोनात ✗ अशी खूण करा.





तर काय होऊ शकेल?

खेळू काळजीने ....

इकडे या, सगळे या
सारे खेळूया, आपण रोज खेळूया

रूमालपाणी आणि लगोरी
विटीदांडू आणि टिपरी
लपाछपी खेळताना गुडूप लपूया
सारे मिळूनी गंमतजंमत करूया

रोज खेळूया, आपण भांडण टाळूया
सगळे मिळूनी, ढकलाढकली टाळूया
सारे खेळूया, चिडवाचिडवी टाळूया
काळजी घेऊया आणि धमाल करूया

चित्रे पाहून गोष्ट सांगा

तीन माकडे

एका जंगलामध्ये तीन माकडे एका झाडावर राहात होती. त्यांची नावे झिप्पी, टिप्पी आणि पिप्पी.

ती फार खोडकर होती. ती रोज काही ना काहीतरी खोड्या करायची. इतर प्राण्यांची टिंगल करायची, त्यांची चेष्टा करायची.

एके दिवशी एक माणूस त्या जंगलातून चालला होता. त्याच्याकडे एक मोठी पिशवी होती.

दमल्यामुळे तो एका झाडाखाली आरामासाठी थांबला. लवकरच त्याला झोप लागली.

झप्पी, टिप्पी आणि पिप्पी हे तिघेजण त्याच झाडावर बसले होते. त्यांनी विचार केला, ''आपण या माणसाची थोडीशी गंमत करुया.''

झिप्पी म्हणाला, ''चला, आपण त्या झोपलेल्या माणसाच्या डोक्यावर एक आंबा मारुया.''

टिप्पी म्हणाला, ''नको नको! त्यापेक्षा तो माणूस झोपलेला असताना आपण त्याची पिशवीच पळवूया. त्याने जास्त मजा येईल.''

पिप्पी म्हणाला, ''नाही, तसे करणे बरोबर होणार नाही.''

टिप्पीने पिप्पीचे काही ऐकले नाही. तो झाडावरुन खाली उतरला. त्या माणसाची पिशवी काढून घ्यायचा प्रयत्न करू लागला.

तो माणूस जागा झाला आणि ''चोरऽऽ चोरऽऽ'' म्हणून ओरडू लागला.

इतर प्राणी तिथे धावत आले. त्यांनी तिन्ही खोडकर माकडांना पकडले आणि माकडांच्या राजाकडे नेले. तो माणूसही त्यांच्याबरोबर गेला.

तो माणूस माकडांच्या राजाला म्हणाला, ''ही तीन माकडे माझी पिशवी पळविण्याचा प्रयत्न करीत होती. ती चोर आहेत. तुम्ही त्यांना शिक्षा द्या.''



झिप्पी म्हणाला, ''नाही. तो खोटं बोलतो आहे. आम्ही तर नुसते झाडावर बसलो होतो.''

टिप्पी म्हणाला, ''मी तर झोपेत होतो. मला काय झालं काहीच माहीत नाही.''

पिप्पी म्हणाला, ''टिप्पी या माणसाची गंमत म्हणून पिशवी घेण्याचा प्रयत्न करीत होता. ती त्याला चोरायची नव्हती.''

माकडांचा राजा म्हणाला, ''हे सगळे गोंधळात टाकणारे आहे. कोणाला शिक्षा करावी? कोणती शिक्षा करावी हे मी ठरवू शकत नाही.''

खालील प्रश्नांची उत्तरे द्या आणि माकडांच्या राजाला निर्णय घ्यायला मदत करा.

१. तिन्ही माकडे खरे बोलत होती का?

२. कोण खोटे बोलत होते? कोण खरे बोलत होते?

३. तिन्ही माकडांना शिक्षा द्यायला हवी का?

४. कोणाचे वागणे चुकीचे वाटते?

५. राजाने त्यांना कोणती शिक्षा द्यावी?

मुले काय करीत आहेत?



पोस्टर तयार करूया

अक्षरातील पांढरी जागा वेगवेगळ्या रंगांनी रंगवा. चौकटीत वेगवेगळे रंग भरा किंवा नक्षी काढा.

सगळ्यांचा

आदर

करूया

नम्र का उद्धट?

ज्या वाक्यातून बोलण्यातील नम्रता दिसून येते त्याभोवती गोल करा.

कृपया मला मदत करा.

मी तुझ्याबरोबर येऊ का?

जा चालता हो!

तू मूर्ख आहेस का?

तू मला तुझी पेन्सिल देशील का?

मी तुझा तिरस्कार करतो.

मी तुझ्याशी कधीच बोलणार नाही.

तुला माझ्याबरोबर खेळायला आवडेल का?

मला क्षमा कर. मी तुला मदत करू शकत नाही.

मी हे काम थोडे नंतर केले तर चालेल का?

माझा भाऊ आपल्याबरोबर खेळायला आला तर तुला चालेल ना?

नंतर काय झाले असेल?

दोन लहान माकडे आणि एक मोठे माकड हे तिघे एकमेकांचे चांगले मित्र होते.
ते तिघे एकत्र खेळायचे आणि खूप मजा करायचे.

खूप खेळल्यावर त्या तिघांनाही खूप भूक लागली.
मोठे माकड म्हणाले, ''थांबा मित्रांनो, मी आपल्यासाठी काहीतरी खायला घेऊन येतो.''

मोठे माकड झाडावर चढले आणि बेरीची फळे शोधू लागले. बराच वेळ शोधूनही त्याला फळे मिळाली नाहीत.

त्यानंतर मोठे माकड या झाडावरुन त्या झाडावर असे उड्या मारत आंब्याच्या झाडापाशी आले. त्याने आंबे शोधण्याचा प्रयत्न केला. खूप शोधल्यावर त्याला एक आंबा मिळाला. त्याला खूप आनंद झाला. त्याला भूक लागली होती. हा आंबा आपण एकट्यानेच खाण्याचे ठरवले. तेवढ्यात त्याला आपल्या छोट्या मित्रांची आठवण झाली.

नंतर काय झाले असेल, असे तुम्हांला वाटते?

चांगला मित्र कोण?

राजेश, नितीन आणि अल्ताफ हे तिघे मित्र होते. ते शाळेत एकाच वर्गात शिकत होते. राजेश आणि नितीन शेजारी राहायचे.

एकदा राजेश आजारी पडला. तो बरेच दिवस शाळेत जाऊ शकला नाही.

बरे वाटल्यावर राजेश नितीनच्या घरी गेला. त्याने नितीनला विचारले, ''शिक्षकांनी काय काय शिकविले? माझा शाळेतला जो अभ्यास बुडला आहे, जे मला माहीत नाही, ते तू मला सांगशील का?''

नितीन म्हणाला, ''मी आता कामात आहे, मी तुला उद्या सांगीन.'' पण नितीन त्याने दिलेला शब्द विसरुन गेला.

अल्ताफला राजेशची काळजी वाटत होती. तो आपल्या आईला म्हणाला, ''आई, मला राजेशकडे गेले पाहिजे. बरेच दिवस राजेश शाळेत आलेला नाही.''

अल्ताफची आई म्हणाली, ''जा. पण जपून जा आणि लवकर परत ये.''

अल्ताफ राजेशच्या घरी गेला. त्याने राजेशला विचारले, ''तू कसा आहेस? काय होतंय तुला?''

राजेश म्हणाला, ''मी आता ठीक आहे. मला काही दिवस ताप येत होता. मला काळजी आहे ती माझ्या बुडालेल्या अभ्यासाची.''

अल्ताफ म्हणाला, ''राजेश, तू काही काळजी करू नकोस. तू शाळेत येऊ शकला नाहीस तेव्हा काय काय शिकविले, ते सर्व मी तुला सांगेन.''

राजेशला खूप आनंद झाला. तो अल्ताफला म्हणाला, ''तू माझा खरा मित्र आहेस.''

अल्ताफ हा चांगला मित्र आहे, असे राजेशला का वाटले?

नितीन राजेशचा चांगला मित्र होता का? का नाही?

जोडू नवे मित्र

शाळा आमच्या सुरू झाल्या
नव्या मित्रमैत्रिणी मिळाल्या
हा विशाल, ती तारा
हा महमद, ती मीरा
ही रोसा, ती अंतरा
ही फुलवा, ती दारा
शाळेत आम्ही सोबत येतो
सुट्टीत खाऊ सोबत खातो
पटांगणात खूप खेळतो
एकमेकांच्या खोड्या काढतो
हसून खेळून मैत्री वाढवतो
नवे नवे मित्र जोडतो

मैत्रीचे गाणे

आपण सगळे बहीणभाऊ
आनंदाने मजेत राहू
एकसुरात गाणे गाऊ
मदत लागली तर धावून जाऊ
टाकून मित्रा कधी न खाऊ
कुणा न आम्ही मागे ठेवू
आपण सगळे बहीणभाऊ
आनंदाने मजेत राहू
कधी भेटता वाटेवरती
टाळी देऊ हातावरती
कधी जर झाली कट्टी
लगेच घेऊ आपण बट्टी
आपण सगळे बहीणभाऊ
आनंदाने मजेत राहू

मुले काय करीत आहेत?

त्यांना काय वाटत असेल?

चित्रे पाहा. चित्रात दाखविलेल्या व्यक्तींना काय वाटत असेल ते सांगा.



सागर दु:खी का आहे?

(सागर उशीराने घरी परत येतो.)

आई : सागर, अरे इतका वेळ तू कुठे होतास?

(सागर उत्तर देत नाही.)

सागर, अरे मी तुझ्याशी बोलतेय. कुठे होतास तू?

(सागर काहीही उत्तर न देता एका कोपऱ्यात जाऊन बसतो)

सागर, अरे तू बहिरा झाला आहेस का? तू उत्तर का देत नाहीस?

(आईने पाहिले तर सागर रडत होता. ती त्याच्या जवळ गेली. तिने विचारले.)

आई : सागर, काय झालंय?

सागर : मी एकटाच बागेत बसलो होतो.

आई : एकटा? का? काय झालं?

सागर : आई! मी चष्मा घालतो म्हणून सगळी मुलं मला चिडवतात. 'काका' म्हणतात.

आई : अरे,पण हे तू मला आधी का सांगितले नाहीस.

(आई बाहेर जाते आणि मुलांना हाका मारते.)

आई : चिंटू, रशिद , अमेय, मनजीत, दिपू सगळे इकडे या बरं.

(मुलं धावत येतात)

आई : तुम्ही सारे मित्र आहात ना? तरी तुम्ही सागरला चिडवता?

मुले : काकू! आम्ही गमतीने बोलतो त्याला.

आई : गमतीने? दिपूला कोणी बुटक्या म्हणाले, रशिदला बारक्या आणि अमेयला जर जाड्या म्हणाले तर तुम्हांला काय वाटेल?

(मुलं विचार करु लागली.)

भारतातली मुले

मी आहे जसविंदर
गाव माझं चंदिगड
पंजाबी मी बोलतो
हिंदी सुद्धा शिकतो

मी आहे बिनिता
माझं गाव कोलकाता
बंगाली मी बोलते
सगळ्यांबरोबर आनंदी राहते

मी आहे बेंजामिन
पणजीला मी राहतो
कोकणी मी बोलतो
गमती जमती करतो

मी आहे माधुरी
गाव माझे रत्नागिरी
मराठी माझी चांगली
मैत्रीण माझी बंगाली



मी आहे समशेर
माझ गाव अेमेर
उर्दू मी बोलतो
इतर भाषाही शिकतो

मी आहे परिणिती
गाव माझं गुवाहाटी
आसामी मी बोलते
चीज मला आवडते

मी आहे रोहित पिलाई
गाव माझं चेन्नई
तामिळ, तेलगू मला येते
हिंदी मला आवडते

गाव, भाषा असल्या
आमच्या अनेक
भारतातली आम्ही
सारी मुले एक

वेगवेगळी कामे

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

उंदराची टोपी

(एका उंदराला रस्त्याने जाताना एक पांढऱ्या रंगाचा कापडाचा तुकडा सापडतो.)

उंदीर : किती छान कापड आहे हे! मी त्याची टोपी बनवीन, पण हे तर मळलेले आहे. मला हे स्वच्छ करुन, धुऊन घ्यायला हवे. (उंदीर कपडे धुणाऱ्याकडे जातो)

उंदीर : दादा मला एवढं कापड धुऊन द्याल का?
(कपडे धुणारा त्याला कापड धुऊन देतो. उंदीर त्यांचे आभार मानतो.)

उंदीर : दादा मला तर लाल रंगाची टोपी हवी आहे. त्यासाठी मी काय करू?

कपडे धुणारा : तू असं कर, कपडे रंगवणाऱ्याकडे जा. तो तुझे कापड लाल रंगाने रंगवून देईल.
(उंदीर कपडे रंगविणाऱ्याकडे जातो.)

उंदीर : दादा, तुम्ही मला हे कापड लाल रंगाने रंगवून द्याल का? (रंगविणारा कापड घेतो. लाल रंगाच्या डब्यात बुडवतो. सुकल्यावर ते उंदराला परत देतो.)

उंदीर : दादा, तुमचा आभारी आहे. आता मला याची टोपी कोण बरं शिवून देईल?

कपडे रंगविणारा : थोडा पुढे चालत जा. तिथे तुला एक कपडे शिवणारा भेटेल. (उंदीर कपडे शिवणाऱ्याकडे जातो.)

उंदीर : मामा, मला या कापडाची टोपी शिवून द्याल का?
(कपडे शिवणारा ते कापड घेतो.)

कपडे शिवणारा : उद्या ये. आज मी फार कामात आहे.

उंदीर : मामा, मला तर ती टोपी आजच पाहिजे होती.

कृपया द्या ना शिवून.

कपडे शिवणारा : बरं बरं ठीक आहे. बसं थोडा वेळ शांतपणे. (उंदीर टोपी शिवून होईपर्यंत दुकानात बसून राहतो. थोड्या वेळात टोपी तयार होते.)

कपडे शिवणारा : ही बघ तुझी टोपी. (उंदीर टोपी घेतो. डोक्यात घालून पाहतो. त्याला टोपी खूप आवडते.)

उंदीर : धन्यवाद मामा ! टोपी छान झाली. मला आता या टोपीवर नक्षी कोण काढून देणार ?

कपडे शिवणारा : या रस्त्याच्या शेवटी एक बाई भरतकाम करते. ती नक्षीकामही करते. ती तुला टोपीवर नक्षी काढून देईल. (उंदीर भरतकाम करणाऱ्या बाईकडे जातो.)

उंदीर : ताई, तुम्ही मला टोपीवर नक्षी काढून द्याल का ?
(बाई ती टोपी घेते)

भरतकाम करणारी बाई : माझ्या हातात आता काम आहे. ते थोड्या वेळात संपेल. तू असं कर, तू अर्ध्या तासानंतर ये.

उंदीर : ताई, मला आताच टोपी मिळाली तर खूप आनंद होईल.

भरतकाम करणारी बाई : बरं बाबा, तुमच्या आनंदातच आम्हांला आनंद वाटतो. दे इकडे. (उंदीर टोपी देतो आणि टोपीवर काढली जाणारी नक्षी पाहात बसतो. थोड्यावेळात नक्षी काढून पूर्ण होते.)

उंदीर : ताई, तुमच्यामुळे टोपी खूपच छान झाली. धन्यवाद ताई. (उंदीर चालू लागतो. त्याला त्या नक्षीदार टोपीचा खूप अभिमान वाटू लागतो.)

वर्तमानपत्राच्या कागदापासून टोपी तयार करा



१ घडी पाडण्यासाठी अर्धे दुमडून घ्या. पुन्हा उघडा.



२ अर्धी घडी करा.



३ तुटक रेषेवर कागद आत दुमडून घ्या.



४ तुटक रेषेवर आत दुमडून घ्या.



५ तुटक रेषेवर आत दुमडून घ्या.



६ उलटे करा



७ तुटक रेषेवर आत दुमडून घ्या.



८ तुटक रेषेवर आत दुमडून घ्या.



९ तुटक रेषेवर आत दुमडून घ्या.



१० तुटक रेषेवर आत दुमडून घ्या.



११ पोकळ भाग आत घाला.



१२ टोपी तयार

माझे घोषवाक्य



मी असे करतो

खाली दिलेली वाक्ये वाचा. त्या पुढील योग्य त्या रकान्यात अशी ✓ खूण करा. एका वाक्यापुढे एकच खूण करा.

वाक्ये	कधीही नाही	कधीकधी	नेहमी
मला शाळेत यायला आवडते.			
मला माझे वर्गमित्र आवडतात.			
मला माझ्या कल्पना दुसऱ्यांना सांगायला आवडतात.			
मी काही करण्यापूर्वी विचार करतो.			
मी माझ्या वस्तूंची काळजी घेतो.			
मी रोज दात घासतो, अंघोळ करतो.			
मी नियम पाळतो.			
मी खरे बोलतो.			
मी इतरांशी विनम्रपणे बोलतो.			
मी गटकार्यात इतरांबरोबर चांगले काम करतो.			

पाहा, चित्र काढा आणि रंगवा

प्रत्येक चित्र पाहा, दिलेल्या जागी ते काढा आणि रंगवा.







अंक जोडून चित्र पूर्ण करा

शिक्षक नोंदी

मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

उद्देश :

''शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील आणि कर्तबगार नागरिक बनावेत म्हणून, संविधानातील मूल्ये व त्यासंबंधित कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना नियोजित अशा संधी सातत्याने देणे.''

स्वरूप आणि वैशिष्टये :

- राज्य घटनेतील मूल्ये शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून वयोगटानुसार रुजविण्याचा प्रयत्न
- ज्ञानरचनावादावर आधारित बालस्नेही, आनंददायी, विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा वापर
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, शिक्षण हक्क कायदा २००९ आणि प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ यावर आधारित
- मूल्ये 'शिकविली' जात नाहीत, तर ती 'नियोजित उपक्रमांतून आनंददायी पद्धतीने रुजविली' जातात
- शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधणारा कार्यक्रम
- मूल्यशिक्षणासाठी शाळेमध्ये सध्या होणाऱ्या प्रयत्नांना पूरक कार्यक्रम
- 'समग्र शाळा दृष्टीकोन' (Whole-School Approach) अंगिकारून मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला जातो.
- शाळांच्या गरजा, प्राधान्यक्रम, उपलब्ध असणारी साधन सामग्री यानुसार आवश्यक वाटतील असे बदल करून राबवता येणारा लवचिक कार्यक्रम

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण)
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे – ४११ ०३०